# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 18/02/2016 (का.प.क्र.13) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक 18 फेब्रुवारी 2016 रोजी (का.प.क्र.13) मा.सभापती श्री.दिलीप गंगाधर थोरात यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-20 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
02. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
03. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
04. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
05. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
06. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
07. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
08. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
09. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
10. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
11. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
12. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
13. स.स.श्रीमती रेश्मा अशफाक कुरैशी

श्रीमती समीना शेख : आपल्या देशाच्या बॉर्डरवर स्व.हनुमंतअप्पा व जे सैनिक शहीद झाले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

शहर अभियंता : क्रिडा अधिकारी म्हणून काम केलेले रावसाहेब मालोदे यांचे निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

उपआयुक्त (प्र.) : सिध्दार्थ जलतरण व्यवस्थापक म्हणून अनेक वर्ष काम केले क्रिडा शिक्षक म्हणूनही काम केले. श्रध्दाजंली अर्पण करावी.

मा.सभापती : ठिक आहे सर्वांनी श्रदाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.
या वेळी स्व.हनुमंतअप्पा तसेच बॉर्डरवर शहीद झालेले सैनिक तसेच मनपातील अधिकारी श्री.रावसाहेब मालोदे यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.इरशाद खान : जुन 2015 पासून मागणी करतो माझ्या वार्डात दोन्ही मधला भाग सोडून ड्रेनेज लाईनचे टाकण्यात येत आहे असे का ?

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : काम सुरू केले होते. नाल्याच्या जागेवर काहींनी अक्षेप घेतला समजावून सांगितले मालकी हक्क बघून कार्यवाही केली जाईल ती जागा हस्तगत करणार व काम सुरू होईल.

मा.सभापती : तातडीने कार्यवाही करावी काम करण्यात यावे.

श्री.इरशाद खान : 5 एकर 35 गुंठे जमिन होती 2 एकर 17 गुंठे कोर्टाने परत केली या बाबतचे सर्व कागदपत्र नगररचना विभागास दिले.

मा.सभापती : नगररचना विभागाची मदत घेऊन कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| श्री.मकरंद कुलकर्णी | : माझ्या वार्डात ड्रेनेजचे पुर्ण पाणी नाल्यात सोडले. |
| मा.सभापती | : काम सुरू असतांना नागरीकांची काळजी ठेकेदारानी घ्यावी तशा सुचना त्यांना दयाव्यात त्वरीत काम सुरू करावे. |
| श्री.विकास एडके | : टीडीआर संदर्भात माहिती मागितली होती उत्तर दिले,मान्य नाही कोणती जागा भुसंपादीत करतो त्यांचा मोबदला देतो त्याचा मोजणी नकाशा काढायची गरज आहे.1985 ला मोबदला दिला होता.त्यांचा मोजणी नकाशा आहे का न.भु.11602 कटकट गेट येथील जागेचे प्रकरण आहे. |
| मालमत्ता अधिकारी | : या प्रकरणी रितसर भुसंपादन 1985 ला केले होते मोबदला पास करून रितसर जागा घेतली त्यानंतर जमिन मालकाने अर्ज दिला की माझी जास्तीची जागा घेतली उर्वरीत जागेचा मोबदला द्यावा. यासंबधी रितसर मा.सर्वसाधारण सभे समोर सर्व बाबी निदर्शनास आणून देऊन उर्वरीत जागेचे भुसंपादन करावे सभेत ठराव केला भुसंपादना साठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले दरम्यान रस्त्याचे काम सुरू झाले. |
| श्री.विकास एडके | : आधीचा मोजणी नकाशा होता का ? |
| मालमत्ता अधिकारी | : रितसर भुसंपादन केलेले आहे.या मध्ये काही तोडगा काढता येतो का टीडीआर देता येतो का? दरम्यानच्या काळात प्रकरण मा.कोर्टात गेले व महापालिका टीडीआर देत असेल तर प्रकरण मागे घेतो असे त्यांचे म्हणणे होते. त्यानंतर जाहीर प्रगटन दिले कुणाचा काही अक्षेप आहेत का अक्षेप आले नाही. टीडीआर देण्याची कार्यवाही केली ती करीत असतांना शाखा अभियंता यांनी रितसर ताबा पावती केली रजिस्ट्री करून दिली त्यावर नाव लावून दिले त्यानंतरच टीडीआर लागू केला. मोजणी नकाशा बाबत संचिका बघून योग्य ती कार्यवाही केली जाईल. |
| श्री.विकास एडके | : टीडीआर दिला दोन सिटीएस नंबर दिले. मोबदला दिला दोन वेगवेगळी अमाऊंट व सीटीएस दिले. 11602 मध्ये 3535 स्क्वे.मीटरचा टीडीआर दिला याची जुळवाजुळव होत नाही जागा शिल्लक नाही चुकीने एकच सीटीएस टाकल्या गेला असेल तर सीटीएस नं 11601 पुन्हा टीडीआर उचलावा यासाठी ओपनस्पेस सोडला का ? |
| मालमत्ता अधिकारी | : मा.सर्वसाधारण सभे समोर रितसर भुसंपादनासाठी पाठविले आहे. |
| श्री.विकास एडके | : एकच सीटीएस अवार्ड झाला यात दोन सीटीएस देतो आहे |
| मा.सभापती | : 2-2 भुमापन क्रमांक बाबत संपूर्ण चौकशी करावी जागेचा नकाशा ई.बाबत सर्व माहिती घेऊन चौकशी करावी आठ दिवसात अहवाल सादर करावा. |
| श्री.विकास एडके | : वार्ड कार्यालयात कनिष्ठ अभियंता कमी आहेत. अनेक कामाचे अंदाजपत्रक बनविले नाही. |
| मा.सभापती | : ताबडतोब कार्यवाही करावी. |
| श्री.विकास एडके | : प्रिया मार्केट मध्ये 02 बीअर शॉपी ना हरकत प्रमाणपत्र रद्य करण्यात आले 2006 मध्ये महापालिकेचे अधिकारी यांनी दिले महापालिकेच्या नियमानुसार दिले का दिले नसेल तर ज्यांनी दिले त्यांचेवर कार्यवाही करावी.लायसन्स रद्य करावे. |
| मा.सभापती | : अतिरिक्त आयुक्त यांनी या प्रकरणात लक्ष देऊन कार्यवाही करावी. |
| श्रीमती समीना शेख | :मस्कट कन्ट्रक्शनला ब्लकलिस्ट करण्याचे मा.आयुक्तानी आदेशीत केले होते की नाही. तसेच जेएनआय एजन्सीला ब्लॅकलिस्ट का करीत नाही. |
| श्री.गजानन मनगटे | : अजबनगर वार्ड 66 मध्ये दोन रस्त्याची कामे दोन ठेकेदाराची घेतली एक काम जानेवारी 2015 दुसरे काम नोव्हेबर 2015 मध्ये दिले.ए एस कन्ट्रक्शन यांना काम |

दिले. वेळोवेळी सुचना करूनही संबधीत ठेकेदार काम करीत नाही त्यांचेवर कार्यवाही का होत नाही. आता एजन्सी मालक फोन उचलत नाही.

शहर अभियंता : क्रॉक्रीट रस्त्याचे काम जे पी इन्टरपाईजेसचे होते त्यातील काही काम मस्कट कन्ट्रक्शनला दिले काम होत नाही म्हणून पेपरला आले त्यानुसार मा.आयुक्तांनी कार्यवाही करण्याच्या सुचना केल्या त्यावर मा.आयुक्तांशी चर्चा केली मधला मार्ग काढून जे त्यांना ब्लॅकलिस्ट केल्यास काम बंद करणार काय असा प्रश्न निर्माण झ ाला त्यांना नोटीस दिली आहे कार्यवाही केली जाईल.जेएनआय संदर्भात बातम्या आल्या त्यांनाही पत्र दिले लवकरच कामे करून घेतली जातील.

मा.सभापती :काम करीत असतांना कोणत्याही त्रृटया असणार नाही काही वेळा ठेकेदारांना संधी दयावी लागते ठेकेदार यांनी सुध्दा काल मर्यादेत काम करावे ते काम करण्यास तयार नसतील तर ब्लॅकलिस्ट करता येईल तशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

श्रीमती समीना शेख : शुभांगी कन्ट्रक्शनला ब्लॅकलिस्ट करण्यास सांगितले, का केले नाही.

कार्य.अभियंता(ब इ फ) : 25-30 कामे या एजन्सीने केली आहे. संचिका आलेल्या आहे कामाची पाहणी करणार आहे रिपोर्ट सादर करणार आहे. एक महिणा लागेल.

श्री.मनगटे गजानन : माझ्या वार्डात गल्ली नंबर 4,7 मध्ये मा.आयुक्तांनी पाहणी केली काम चालू करण्याचे आदेशीत केले.काम सुरू होत नाही.

श्री.अब्दुल र नाईकवाडी: सेन्ट्रल नाका येथील व्हाईट टॅपींगचे काम का थांबविले.पोलीस उपआयुक्त कार्यालया एमजीएम पेट्रोल पंपाजवळ मोठा खड्डा खोदला काम अदयाप झाले नाही. एकही काम होत नाही.

कार्य.अभियंता(श्री.सिद्यीकी): व्हाईट टॅपींगचे काम केले फुटपाथचे बजेट नाही बजेट मध्ये ॲड केले होते इतर फंडातून राहिलेले काम केले जाईल.

मा.सभापती : तातडीने तेथील काम करण्यात यावे.

श्री.नितीन चित्ते : 7-8 महिण्यात मोठमोठी रस्त्याची कामे चालू आहे. काही क्षेत्रात काम मर्यादीत असेल सदस्यांच्या भावना व वेळोवेळी दिलेले सुचना आदेश त्यात गतिमानता नाही स्थायी समितीत झालेले निर्णय व जे की दोषी अधिका-यावर काय कार्यवाही केली याचा पुर्ण खुलासा पुढील बैठकीत देण्यात यावा. 15 लक्षची कामे वार्डात होत नाही. ती कोणत्या हेड मधून करायची पॉलीसी डिसीजन घेऊन मार्ग काढला पाहिजे समितीत जे निर्णय होतात अमलबजावणी होत नाही. महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री महोदय यांचेवर एका अधिका-यांने पिटीशन दाखल होते शरमेची बाब आहे ते पिटीशन प्रकरण काय होते खुलासा करावा.

श्री.विकास एडके :4-2-2016 चे पत्र आहे त्यामध्ये दिले की आता ठराव विखंडीत करण्याची गरज वाटत नाही शासन स्तरावर निर्णय घेणे योग्य राहिल अशी विनंती. त्यानंतरच लगेच चार दिवसांनीच दिं. 8-2-2016 त्यामूळे सादर ठराव म.महानगरपालिका अधि. 1949 कलम 451 यानुसार खंडीत करण्यात यावा ही विनंती.

मा.सभापती : सदस्यांच्या भावना व मुद्दे असतील त्याची अमलबजावणी केली पाहिजे आतापर्यतचे स्थायी समितीने दिलेले निर्णय त्या बाबतीत काय कार्यवाही केली. दोषीवर काय कार्यवाही करणार आहे खुलासा प्रशासनाने करावा.

मा.अति.आयुक्त :आतापर्यत सदस्यांनी जे जे प्रश्न उपस्थित केले जे निर्णय सभागृहाने दिले. ते प्रश्न सोडविण्याचे सुचना त्या त्या अधिका-याना दिले आहे टीडीआर संदर्भात चौकशी चालू आहे वेळ लागेल सजेशन आब्जेशन घ्यावे लागतील.मा.मुख्यमंत्री साहेबावर

| | |
|---|---|
| | कन्टेम झाले त्या प्रकरणात एका अधिका-यांचे प्रमोशनचा तो विषय होता त्यांचे अपील नगरविकास विभागाकडे होते. नगरविकास विभागाने काही विचारणा केली होती. प्रोसीजर झाली नाही या प्रकरणात डिले झाला क्लिअरकट आहे. श्री.बनसोडे यांना कार्य.अभियंता पदावर प्रमोशन संदर्भात ठराव होता त्यात अंशत अमलबाजवणी झाली. |
| श्री.विकास एडके | :काही तरी जबाबदारी दाखवायची म्हणून थोडया कालावधीसाठी पद दिले आणि पालन केले असे सांगणे बरोबर नाही. |
| मा.अति.आयुक्त | : कमेटीने दिले.शासन मान्यता पाहिजे होती आपली परीस्थिती आहे तीच परीस्थिती वरील स्तरावर निर्माण झाली. शेवटी राज्याच्या प्रमुखांवर हा प्रश्न ओढावला या प्रकरणी सतत संपर्क चालू होता. |
| श्री.विकास एडके | : अन्याय आहे त्यास चेंज करू शकत नाही कन्टेम दाखल होते तेंव्हा पत्र काढतात. यात कुणी तरी दोषी आहे कार्यवाही व्हावी. |
| मा.अति.आयुक्त | : संबधीत आस्थापना अधिकारी यांना नोटीस दिली आहे खुलासा येईल त्यानुसार कार्यवाही होईल. |
| मा.सभापती | : जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. |
| श्री.गजानन बारवाल | : स्थायी समितीने दिलेले आदेशाची अमलबजावणी होत नाही.अनेक कामा बाबत पाहणी केली ब्लॅकलिस्ट करण्याचे सांगितले होते. कार्यवाही केली नाही जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे. |
| मा.सभापती | : सर्वच विकास कामे करण्या बाबत सर्व अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते. |
| श्री.कमलाकर जगताप | : मुकूंदवाडी शाळेच्या पाठीमागिल मनपाच्या जागेवर अतिक्रमण झाले प्रश्न केला होता उत्तर दिले नाही. तेथेच ए-1 हॉटेल चालू आहे. |
| प्रशासकीय अधिकारी | : संचिका विधी विभागाकडे कार्यवाही अंतर्गत आहे या संदर्भात मा.न्यायालयात प्रकरण चालू आहे.सबधीतास नोटीस दिली खुलासा आल्यानंतर कार्यवाही केली जाईल. |
| मा.सभापती | : प्रशासकीय अधिकारी यांनी माहिती घेऊन कार्यवाही करावी. |
| श्री.कमलाकर जगताप | : मुकूंदवाडी मुख्याध्यापकाने गैरव्यवहार केला आहे खाते चौकशी करण्याचे सांगितले चौकशी केली नाही नुसती बदली केली. |
| उपआयुक्त (प्र) | : सदरील मुख्याध्यापक यांची बदली करण्यात आली आहे सन 2012 पासुन सदर शाळेचे ऑडीट करणे बाबत मुख्य लेखा परीक्षक यांना पत्र दिले. |
| मुख्य लेखा परीक्षक | : या बाबत ऑडीट करून अहवाल देण्यात येईल. |
| श्री.कमलाकर जगताप | : सारा पार्क मध्ये प्रायव्हेट सुरक्षा रक्षक आहे त्यांचेकडे 10 वाहने आहेत उपआयुक्ताच्या नावाने नळाचे बील आले. |
| मा.सभापती | : चौकशी करावी कार्यवाही करावी. |
| श्री.नितीन चित्ते | : सुरक्षा रक्षका विभागाचे ऑडीट करावे.त्यांचे पगारा इतके उत्पन्न येत नाही एन-9 एम -2 मध्ये कम्युनिटी सेटंर 14000 पगारी व्यक्ती आहे. भाडे घेतो 3100 खर्च 5.50 लक्ष उत्पन्न 1.21 लक्ष येते. स्व.प्रमोद महाजन क्रिडा संकुल मध्ये वॉचमनची गरज, जेथे आवश्यक तेथे वॉचमन कर्मचारी दयावे. शाखा अभियंता यांना विविध कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेशीत करावे. |
| प्र.सुरक्षा अधिकारी | : बैठक संपल्यानंतर आढावा घेऊन कार्यवाही केली जाईल. |
| श्री.मकरंद कुलकर्णी | : बाळासाहेब बॉटॅनिकल गार्डन येथे सुरक्षा रक्षक नाही |

श्री.कमलाकर जगताप : पल्स पोलीओ जाहीरात फलक लावण्यास महापालिकेची परवानगी घेतली आहे का ?

आरोग्य वैद्य.अधिकारी : एनजीओ यांचे सौज्न्याने माहिती छापून दिली जाते संस्थेचा सहभाग आहे.

श्री.नितीन चित्ते : सेवानिवृत्त कर्मचा-यांचे जीपीएफ व इतर पैसे मिळत नाही श्री.मालोदे ज्यांना श्रध्दाजंली अर्पण केली तीन वर्षापासून महापालिकेत खेटया मारत होते.इतर ही कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यांना पैसे मिळत नाही.

प्र.मुख्यलेखाधिकारी : यादी तयार केली आहे अन्याय कुणावर ही होणार नाही निवृत्त झालेल्या तारखेची जेष्ठता लक्षात घेऊन सर्वाना त्यांचे पैसे देण्यात येईल.

मा.अति.आयुक्त : टॅक्स वसुली, शासनाची योजना टॉयलेट सर्वे करणे संदर्भात योजना आहेत त्यात कर्मचारी नियुक्त केले. ठराविक कालावधीसाठी कर्मचारी दिले आहे.कर्मचारी संख्या कमी आहे.सदर कर्मचारी यांनी त्यांचेकडील स्वतःचे काम सांभाळून हे करायचे आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान योजना आली आहे. ही कामे प्राधान्याने घ्यावी लागेल

श्री.नितीन चित्ते : प्रत्येक वेळी प्रशासन सांगते कर्मचारी वर्ग कमी आहे.याबाबतीत ठोस निर्णय का घत नाही. 8 जानेवारी 2016 शासन निर्णय आहे प्रशासकीय विषयक आवश्यक सेवेसाठी सेवानिवृत्त कर्मचारी मानधनावर घेऊ शकतो. ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तेथे घेण्यात यावे. दोन तीन चार्ज एका अधिका-याकडे आहेत शिक्षणाधिकारी पदावर अधिकारी नाही.किती दिवस आहे त्याच कर्मचा-याकडून काम करून घेणार आहे.

उपआयुक्त-आस्थापना : शासन जी आर नुसार कर्मचारी भरती संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा झाली. संचिका सादर केलेली आहे मान्यता झाल्यानंतर कार्यवाही सुरू होईल.

मा.सभापती : ज्या पदाचे कर्मचारी आवश्यक आहे ती भरती प्रक्रिया सुरू करण्याची कार्यवाही करावी. आकृतीबंध तयार केला शासनाकडे पाठविले पाठपुरावा होतो का ? अनेक कर्मचारी या दोन तीन वर्षात निवृत्त होणार आहे असे असतांना भरती करणारच नाही का?

श्री.अब्दुल र नाईकवाडी: चिश्तिया कॉलनी ते लोकमत भवन आतिल रस्त्यावर झालेले अतिक्रमणा संबधीत पत्र दिले होते संबधीताना सदस्यांचे नाव टाकून नोटीसा दिल्या त्या पत्राची मुदत संपली नाही का कार्यवाही का होत नाही. 40 फुट रस्ता 10 फुट राहिला.

प्रशासकीय अधिकारी : मालकी हक्का बाबत नोटीस दिली आहे चुकून सदस्यांचे नाव त्या पत्रात टाकले गेले. संबधीत कर्मचारी याना ताकीद दिली तो विषय संपला आहे. संबधीतांनी कागदपत्रत दिले नाही टपरी वगैरे बसलेल्या आहेत ती जागा रस्त्यामध्ये आहे असे म्हणणे होते या संदर्भात नगररचना विभागात मार्कींग करण्या बाबत कळविले मार्कींग करून दिल्यास कार्यवाही करता येइल.

श्री.अब्दुल र नाइकवाडी: चिश्तिया चौक ते बजरंग चौक रस्त्यावर अतिक्रमण झाले पत्र दिले कार्यवाही होत नाही.

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

श्री.मकरंद कुलकर्णी : बजरंग चौक ते बळीराम पाटील स्कल पर्यतचा रस्ता पुर्ण झाला नाही.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी कार्यवाही करावी.

श्री.विकास एडके : दि.20-5-2014 रोजी सर्वसाधारण सभेने ठराव घेतलाकी हर्सुल तलावात मृत्यू झालेल्या तीन बालकाच्या नातेवाइ्कांना आर्थीक मदत दयावी अदयाप कार्यवाही

केली नाही. एकाच कुटूंबातील दोन मुले होती. त्या मुलाचे आई वडील महापालिकेत दररोज मदतीसाठी चकरा मारतात. याची दखल घ्यावी.

मा.अति.आयुक्त : कायदयाच्या तरतुदीनुसार नैसर्गीक आपत्तीतून घटना घडली असेल व महापालिकेची आर्थीक परीस्थिती बघता अशी मदत करता येते.

श्री.विकास एडके : जेवढी मदत करता येईल ती करावी शहागंज मध्ये एक घटना घडली तेथे कंपनी कॉम्पन्सेशन देण्यास तयार असते. हा तलाव तर महापालिकेच्या मालकीचा होता.मदत दिली पाहिजे.

मा.सभापती :हा महासभेने ठराव घेतलेला आहे नैसर्गीक आपत्तीतून झाले तर देता येते 2-3 वर्षात मदत दिलेली नाही.

श्री.गजानन बारवाल :यापुर्वी शॉटसर्कीटची घटना झाली, झाड पडले साप चावला त्यांना मदत दिली. दयायची की नाही हा आपला अधिकार आहे.

मा.अति.आयुक्त :यापुर्वी काय कार्यवाही केलेली आहे माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती : अति.आयुक्त यांनी मा.आयुक्तांशी या बाबतीत चर्चा करून या बालकाच्या कुटूंबीयांना आर्थीक मदत देता येणे शक्य असेल तर कार्यवाही करावी.

श्रीमती समीना शेख : सलीम अली सरोवर गेट परीसरात दारू पिणारे पत्ते खेळणारे लोक असतात तेथे अवैध धंदे चालत आहे.

कार्य.अभियंता(बीओटी) : सुरक्षा रक्षक नाही. त्यांना कामावरून काढून टाकण्यात आलेले आहे.

श्री.मकरंद कुलकर्णी : एन-8 नेहरू गार्डन येथेही सुरक्षा रक्षक देण्यात यावे.

मा.सभापती : सुरक्षा रक्षक देण्यात यावे.

श्रीमती शेख समीना : विदयुत विभागाचे कामा बाबत मी माहिती विचारली होती दिली जात नाही. भ्रष्टाचार झालेला आहे.

मा.अति.आयुक्त : चौकशी करण्याचे आदेशीत केले त्यानुसार संचिका मागीतल्या आहेत 2011 व 2013-14 च्या संचिका तपासणी होत आहे 1 महिण्याचा कालावधी लागेल.

श्री.नितीन चित्ते : मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेवर जे पिटीशन दाखल झाले त्या संदर्भात खुलासा करावा.

विधी सल्लागार : 9 तारखेला प्रकरण बोर्डावर होते. मा.मुख्यमंत्री महोदय यांना या प्रकरणी याचिकेमध्ये पार्टी करण्यात आले होते. श्री.रामटेके यांनी कार्य.अभियंता पदाच्या संदर्भात 451 नुसार मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे अपील केले होते. मा.न्यायालयाने प्रकरण मुदतीत निकाली काढावे असे म्हटले होते मुदतीत कार्यवाही झाली नाही. आज बोडवर प्रकरण आहे. शपथपत्र दाखल केले आहे.

श्रीमती कमल नरोटे : माझ्या वार्डातील ड्रेनेज लाईनचे काम होत नाही.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : भुमिगत गटार लाईनचे कामासाठी आता तूट आली आहे व मुख्य लाईनचेच काम करावे अशा सुचना आहे. इतर लाईन आता मनपा फंडातून कराव्या लागतील.

मा.सभापती : महापालिका फंडातून काम करण्यात यावे.

श्री.मकरंद कुलकर्णी : ढापे मिळत नाही.

शहर अभियंता : 10-15 दिवसात 500 चौकोणी व 500 गोल ढापे येणार आहे सीएसआर अक्टीव्हिटी फ्रि ऑफ कॉस्ट मिळणार नाही भुमिगत गटार योजनेचे शासनाने 110 कोटी कपात केले आहे अमृत योजनेसाठी पाठपुरावा चालू आहे पैसे आल्यानंतर काम होईल. जेथे आवश्यक ड्रेनेज लाईनचे काम करणे आवश्यक आहे ते करण्यात

येतील स.सदस्या श्रीमती नरोटे यांचे वार्डातील आवश्यकता बघून अशी कामे मनपा फडांतून करावी लागणार आहे.

श्री.गजानन मनगटे : दिनांक 22-1-2015 रोजी प्रस्ताव मंजूर केला सौ. निरूगवल यांना 500 दंड आकारून कामावर घेण्या संदर्भात निर्देश दिले सहा महिण्यापासून त्या महिलेला पगार नाही.

श्री.नितीन चित्ते : ज्या त्रृटया असतील त्या दूर कराव्या.आदेश दयावेत.

मा.सभापती : स्थायी समितीने निर्णय दिलेला आहे त्यांना कामावर घ्यावे.

उपआयुक्त(आस्थापना) : स्थायी समितीने निर्देश दिल्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. मुदतवाढीचा जेव्हा प्रस्ताव मा.आयुक्तासमोर गेला तो चुकीच्या पध्दतीने माडला गेला होता. मा.आयुक्तासमोर समक्ष हा मुद्दा क्लीअर केला आहे.

श्रीमती समीना शेख : अनधिकृत टावर्स बाबतचा खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : यादी तयार करून आठ दिवसात माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

प्रशाकीय अधिकारी : सर्वसधारण सभेत हा विषय चर्चेला आला आयकॉन शाळेवरील टावर्स सील केले. त्या प्रकरणात पोलीस केस झाली टावर्स बाबत न्यायालयात प्रकरण आहे.ते बंद करू नये असे निर्देश आहे.इंदूगंगा एन 2 येथील टावर्सला आग लागली होती ते अनधिकृत होते.

विधी सल्लागार : मुंबई उच्च न्यायालयाने स्थगीत दिली आहे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात आहे. स्थगिती दिली आहे.

मा.सभापती : नियमानुसार कार्यवाही करावी तसेच आवश्यक तो कर आकारावा.

श्री.गजानन मनगटे : मा.कोर्टात जोपर्यत निर्णय होत नाही तोपर्यत नवीन टावर्स होऊ देऊ नये

प्रशासकीय अधिकारी : वर्कींग डे मध्ये टावर्स उभे राहत असेल तर निष्काषित केलेले आहे.

मा.सभापती : नवीन अनधिकृत टावर्स उभे राहणार नाही या संबधी जाहीर प्रगटन काढावे टावर्स उभे केल्यास कार्यवाही केली जाईल असे जाहीर प्रगटनात नमूद करावे.

श्रीमती ज्योती मोरे : गजानननगर भागात ड्रेनेज लाईनचे काम होत नाही तसेच गुरूदत्त नगर आदर्शकॉलनी भागात पिण्याचे पाण्याचा प्रश्न पाईप केंव्हा बदलणार आहे बाळकृष्ण भागात लाईन टाकली जोडली जात नाही.

कार्य.अभियंता(पापू) : पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती रेश्मा कुरैशी : कोटला कॉलनी पाण्याच्या टाकी येथील काम आतल्या बाजूने करणार होते तसेच या वार्डातील रस्त्याचे काम होत नाही.अर्धवट काम आहे.

कार्य.अभियंता(अ व ड) : तेथे काही वृक्ष आहे ते तोडण्या बाबत संबधीत विभागास पत्र दिले. रस्त्याचे जे काम आहे बघून घेतो कार्यवाही केली जाईल.

श्री.नितीन चित्ते : सिध्दीकी मोतीवाला निराला बाजार येथील इमारतीला पे ॲण्ड पार्क परवानगी दिली का ?

मालमत्ता अधिकारी : पे ॲण्ड पार्क मध्ये खाजगी व्यक्ती वसुली करीत होते.वसुल करीत असेल तर टॅक्स मध्ये ॲडीशनल वसुल करावे लागेल.

श्री.गजानन बारवाल : जी जागा पार्कींग म्हणून दिली तेथेच गाडया उभ्या असाव्या.रस्त्यावर असू नये इतर ठिकाणचे पैसे वसूल करीत आहे.

मा.सभापती : परवानगी देतांना पार्कींगला जागा सोडावी लागेल असे दिले असेल.पार्कींगच्या जागेवर, इतर जागेतीलही वसुली करीत आहे.

मालमत्ता अधिकारी : इतर महापालिकेतून माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती : योग्य खुलासा येत नाही तोपर्यत पार्कींग वसुलीचे काम थांबवावे.

श्री.चित्ते नितीन : जानकीदेवी बजाज या संस्थेने महापालिकेस स्वच्छते साठी 1.60 कोटी निधी दिला काारनामा झाला का? सर्वसाधारण सभेत ठराव केला या रक्कमेतून रिक्षा घेतो असा खुलासा झाला होता का?

मा.सभापती : जानकी देवी बजाज स्वच्छता अभियांन साठी मदत देणार आहे सीआरटी ही वेगळी संस्था आहे की ती सपोर्ट म्हणून आपल्या कर्मचा-या बरोबर काम करणार आहे. महापालिकेकडे तो फंडस् आलेला नाही.मा.आयुक्तांशी चर्चा केली.त्यांना पॉझीटिव्ह म्हणून सोबत राहून काम करून घ्यायचे आहे.या संस्थ्ेचा व महापालिकेचा निधी बाबत संबध नाही. नियंत्रण ठेवण्याचे काम जानकीदेवी बजाज संस्था स्वत: काम करते. वेगळी चर्चा करणे योग्य नाही टप्प्याने पैसे देणार आहे काम केले नाही तर तो निधी विड्रॉल होईल.

श्री.नितीन चित्ते : या संस्थेशी आपण वैयक्ति करारनामा केला आहे काय सर्वसाधारण सभेला विश्वासात घेतले पाहिजे की नाही अवगत सभेला केले पाहिजे होते.

श्री.अब्दुल र नाईकवाडी: भगवान शिक्षण प्रसारक मंडळ इमारती संदर्भात नोटीस दिली होती मुदत संपली नाही काय.

प्रशासकीय अधिकारी : संबधीतास 14-1-2016 रोजी नोटीस दिली मुदत 15-2-16 पर्यत आहे या प्रकरणी सर्व लिगली बाबी तपासणीसाठी तसेच नगररचना विधी विभागा यांचेकडे संचिका पाठविली आहे. अभिप्राय आल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

नगररचना अधिकारी : संचिका आलेली आहे त्या प्रकरणामध्ये शासनाकडून स्टे आलेला आहे.

श्री.इरशाद खान : स्टे ची जी कार्यवाही होते ती सगळयासाठी राहणार काय ?.

मा.सभापती : सगळयासाठी अशीच कार्यवाही राहील

**विषय क्र. 48 :**

दिनांक 29/09/2015 (दि.28/09/15 ची तहकूब सभा का.प.क्र.08), दि.05/11/2015 (का.प.क्र.09), दि.04/12/2015 (दि.05/11/15 ची तहकूब सभा का.प.क्र.09), दि.04/12/2015 (का.प.क्र.10) व दिनांक 21/12/2015 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय क्रमांक 48 मंजूर.

**ठराव :**

दिनांक 29/09/2015 (दि.28/09/15 ची तहकूब सभा का.प.क्र.08), दि.05/11/2015 (का.प.क्र.09), दि.04/12/2015 (दि.05/11/15 ची तहकूब सभा का.प.क्र.09), दि.04/12/2015 (का.प.क्र.10) व दिनांक 21/12/2015 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 49 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, रेल्वेस्टेशन येथील न.भु.क्र.19259 (कोटगिरे कॉम्प्लेक्स) आरक्षण क्र.328 शॉपींग कॉम्प्लेक्स येथील समावेशक आरक्षण तत्वावर विकसीत इमारतीमधील चार हॉलपैकी तळमजल्यावरील मागील बाजुचा एक हॉल ज्याचे बांधीव क्षेत्रफळ 82.30 चौ.मी. आहे. सदरील हॉल महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (महाराष्ट्र शासनाची संस्था MEDA) यांनी त्यांचे विभागीय कार्यालयासाठी भाडेतत्वावर मागितला आहे. सन 2015-16 चे सिध्द शिघ्र गणकानुसार वार्षिक भाडे रू.3,65,939/- येते. त्यानुसार मासिक भाडे रू.30,495/- आहे. सदरील संस्था ही महाराष्ट्र शासनाची संस्था

असल्याने रू.30,495/- त्यावर सेवाकर व सेवाशुल्क वेगळे या दराने तीन वर्षासाठी भाडेतत्वावर देणेकरीता प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास नेहमीच्या अटी शर्तीनुसार हॉल भाडेतत्वावर देऊन करारनामा करून घेण्यात येईल. करीता प्रस्ताव सादर.

श्री.गजानन बारवाल : किती जागा आहे ,काय काय तेथे आहेत.अशा जागा देण्याची प्रोसेस काय आहे.

मालमत्ता अधिकारी :या ठिकाणी महापालिकेस 25 टक्के जागा मिळाली तेथे तळमजल्यावर दोन व वरच्या मजल्यावर दोन असे चार हॉल आहे. ही शासनाची संस्था आहे त्यांना हॉल देणे बाबत प्रस्तावित आहे.

श्री.गजानन बारवाल :ही इमारत केंव्हा बांधूण पुर्ण झाले. 4-5 वर्षापासून जागा रिकामी आहे. ताब्यात केंव्हा घेतली जाहिरात काढली होती कार्यवाही झाली नाही.काही जागा दिली होती काय ? ताब्यात मिळाली तशीच ठेवली होती का ?

मालमत्ता अधिकारी : ही जागा एक महिण्यापुर्वीच हस्तांतर झालेली आहे.

नगररचना अधिकारी : इमारती बाबतचे प्रमाणपत्र दिले मालमत्ता विभागाकडे ताब्यात दिले.

श्री.गजानन बारवाल : रस्त्यावर 20 फुटापर्यत टेंबल जनरेटर लावण्यात आले तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

मा.सभापती : विषय मंजूर उर्वरीत तीन हॉलच्या बाबत निविदा काढण्यात याव्यात ज्या दुकानदारांनी अतिक्रमण केले ते त्वरीत काढावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन येथील न.भु.क्र.19259 (कोटगिरे कॉम्प्लेक्स) आरक्षण क्र.328 शॉपींग कॉम्प्लेक्स येथील समावेशक आरक्षण तत्वावर विकसीत इमारतीमधील चार हॉलपैकी तळमजल्यावरील मागील बाजुचा एक हॉल ज्याचे बांधीव क्षेत्रफळ 82.30 चौ.मी. हॉल महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (महाराष्ट्र शासनाची संस्था MEDA) यांना त्यांचे विभागीय कार्यालयासाठी सन 2015-16 चे सिध्द शिघ्र गणकानुसार मासिक भाडे रू.30,495/- त्यावर सेवाकर व सेवाशुल्क वेगळे या दराने तीन वर्षासाठी नेहमीच्या अटी शर्तीनुसार सदर हॉल भाडेतत्वावर देण्यास व करारनामा करून घेण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 50 :**

मा.आयुक्त महोदय यांची मान्यता दिनांक 21/01/2016 अन्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे प्राणी संग्रहालय हे सिध्दार्थ उद्यान येथे सन 1985 पासून कार्यरत असून हे प्राणी संग्रहालय मराठवाड्यातील एकमेव प्राणी संग्रहालय आहे. या प्राणी संग्रहालयास प्रतीवर्षी सुमारे 7 लक्ष दर्शक भेटी देतात. प्राणी संग्रहालयाचा मुख्य उद्देश दर्शकांचे मनोरंजन किंवा उत्पन्न वाढीचे साधन नसून दुर्मिळ वन्यजीव प्रजातींचे संरक्षण, संवर्धन आणि लोकांमध्ये वन्य प्राण्यांविषयी माहिती व ज्ञान उपलब्ध करून देणे तसेच पर्यावरणा विषयी व वन्य प्राण्यांविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण करणे असा उद्देश आहे. त्यानुसार मनपाचे प्राणी संग्रहालय काम करित आहे.

या प्राणी संग्रहालयात वन्य प्राण्यांच्या 23 प्रजाती असून प्राण्यांची संख्या 310 आहे. तसेच प्राणी संग्रहालयात 01 सर्पालय असून यामध्ये विविध प्रजातींची सर्प दर्शकांसाठी ठेवण्यात आलेली आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान, प्राणी संग्रहालय, मत्स्यालय व मिनी ट्रेन मध्ये प्रवेश करणाऱ्या पर्यटकांकडून खालीलप्रमाणे प्रवेश फी आकारण्यात येते.

| अ.क्र. | प्रवेश फी | प्रौढांसाठी | मुलांसाठी |
|---|---|---|---|
| 01. | सिध्दार्थ उद्यान | रू.10.00 | रू.05.00 |
| 02. | प्राणी संग्रहालय | रू.10.00 | रू.05.00 |
| 03. | मत्स्यालय | रू.05.00 | रू.02.00 |
| 04. | मिनीट्रेन | --- | रू.10.00 |

मागील 3 वर्षामध्ये सिध्दार्थ उद्यान, प्राणी संग्रहालय, मत्स्यालय व मिनीट्रेन प्रवेश फी वसुली खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | 2013-14 ची वसुली | 2014-15 ची वसुली | 2015-16 ची वसुली (डिसेंबर 2015 पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| 01. | सिध्दार्थ उद्यान | रू.88,11,765.00 | रू.86,94,350.00 | रू.86,71,300.00 |
| 02. | प्राणी संग्रहालय | रू.51,26,975.00 | रू.51,77,210.00 | रू.41,64,255.00 |
| 03. | मत्स्यालय | रू.9,21,749.00 | रू.10,54,867.00 | रू.7,59,282.00 |
| 04. | मिनीट्रेन | रू.07,69,250.00 | रू.03,34,900.00 | रू.07,65,500.00 |

वरीलप्रमाणे सिध्दार्थ उद्यान व प्राणी संग्रहालयाची प्रवेश फी वसूली झालेली असून यापूर्वी प्रवेश फी ची वाढ सन 2011-12 मध्ये करण्यात आलेली आहे. औरंगाबाद मनपा प्राणी संग्रहालयाचा अद्ययावत मास्टर प्लॅन केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण-नवी दिल्ली यांचेकडून दिनांक 31/12/2014 रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. मंजूर मास्टर प्लॅन नुसार त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. ज्यामुळे प्राणी संग्रहालयाची मान्यता अबाधित राहू शकेल.

प्राणी संग्रहालय मंजुर मास्टर प्लॅनमध्ये जीर्ण झालेले पिंजऱ्यांची दुरूस्ती, प्राण्यांचे नवीन पिंजरे तयार करणे, पशुवैद्यकीय सुविधांमध्ये वाढ करणे, प्राणी संग्रहालयासाठी आवश्यक असणाऱ्या तज्ञ कर्मचाऱ्यांची भरती करणे, प्राणी संग्रहालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पगार, प्राणी संग्रहालयात येणाऱ्या प्रेक्षकांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा उपलब्ध करून देणे आणि प्राणी संग्रहालयातील विद्युत व्यवस्था, ड्रेनेज व्यवस्था, रस्ते दुरूस्ती करणे इत्यादी बाबींचा प्राणी संग्रहालय मास्टर प्लॅनमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. प्राणी संग्रहालय मास्टर प्लॅन पुढील 10 वर्षाचे नियोजनाकरीता असून या मास्टर प्लॅन अंमलबजावणीसाठी रूपये 30 कोटींची आवश्यकता आहे. ही रक्कम ठराविक कालांतराने प्रत्येक वर्षी खर्च करायची आहे. म्हणुन प्राणी संग्रहालय व सिध्दार्थ उद्यान प्रवेश फी ची दरवाढ झाल्यास उत्पन्नात वाढ होऊन प्राणी संग्रहालयाच्या मास्टर प्लॅनची अंमलबजावणी करणे सोईस्कर होईल.

सध्या प्राणी संग्रहालयातील खाद्य खर्चावर सरासरी वार्षिक रूपये 1 कोटी खर्च होत असून कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी सरासरी मासिक रूपये 8,18,000/- खर्च होत आहे. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ करणेसाठी मनपा अधिनियम 1949 चे कलम 99 नुसार सिध्दार्थ उद्यान, प्राणि संग्रहालय, मत्स्यालय व मिनीट्रेन प्रवेश फी मध्ये करण्यात येणारी प्रस्तावित दरवाढ तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रवेश फी | सध्याचे प्रवेश फी दर रूपये | | प्रस्तावित प्रवेश फी वाढीव दर रूपये | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रौढांसाठी | मुलांसाठी | प्रौढांसाठी | मुलांसाठी |
| 01. | सिध्दार्थ उद्यान | रू.10.00 | रू.05.00 | रू.30.00 | रू.15.00 |
| 02. | प्राणी संग्रहालय | रू.10.00 | रू.05.00 | रू.100.00 | रू.50.00 |
| 03. | मत्स्यालय | रू.05.00 | रू.02.00 | रू.15.00 | रू.10.00 |
| 04. | मिनीट्रेन | --- | रू.10.00 | --- | रू.20.00 |

वरिलप्रमाणे दरवाढ प्रस्तावित करण्यात येत असून मनपाचे आर्थिक उत्पन्नात वाढ करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

श्री.गजानन बारवाल : यात नमूद केलेले दर जाचक आहे. सिध्दार्थ उदयान प्रौढासाठी 30 ऐवजी 20 व मुलांसाठी 15 ऐवजी 10 रूपये घ्यावे तसेच प्राणी संग्रहालय प्रौढासाठी 50 व मुलासाठी 20 मत्सालय प्रौढासाठी 10 व मुलांसाठी 5 रूपये तसेच मिनीट्रेन नादुरूस्त आहे ते दुरूस्त करावी.इतर सुविधा व्यवस्थीत चालविल्या जात नाही. तेथील वास्तु ताब्यात घ्यावी.

श्री.विकास एडके : या दरवाढीला विरोध आहे किती प्रमाणात वाढवली पाहिजे कधीपासून वाढविली नाही आज ज्या प्रमाणे वसुली होते त्यात काय सुविधा देतो किती एकर मध्ये प्रांणी संग्रहालय आहे. नागरीकाकडून पैसे घेतो लघुशंका आली तर टॉयलेटची व्यवस्था आहेत का ?वाढ केल्यास काय सुविधा देणार आहे.

श्री.गजानन मनगटे : जास्त वाढ होऊ नये सिध्दार्थ उदयान प्रवेशासाठी 10 ऐवजी 20 करावे

श्री.मकरंद कुलकणी : तेथे भगवान गौतम बुध्दाची मुर्ती आहे मराठवाडा मुक्ती संग्रहालय आहे.बाहेरील पर्यटक तेथे येतात. वाढ करू नये.

सहा.संचालक(प्रां.सं) : देशातील जे प्रांणी संग्रहालय ते झू ऑथरीटी मास्टर प्लॅनच्या नुसार असते त्यांनी प्रांण्या विषयीचे काही नॉमस् दिलेले असतात. हे 1985 ला संग्रहालय झालेले आहे. येथे जागा कमी असल्यामूळे जनावरांना फिरणेसाठी व इतर वावर करणेसाठी नॉमस् नुसार करणे आवश्यक आहे. स्ट्रक्चर जुने झाले आहे यापुर्वी अनेक प्राण्याच्या विषयी घटना घडल्या केंद्र शासन झु ऑथरटीच्या नॉर्मसनुसार सर्व अदयावत करावी लागणार आहे तेथे कर्मचारी कमी आहे. दर वाढीचा प्रस्ताव दिला समर्थनीय आहे मंजूर करावा तेथील ड्रेनेज लाईनला 40 लक्ष , 50 लक्ष संरक्षित भिंत, विदयुत वायरींग साठी तसेच रस्त्यासाठी खर्च येणार आहे काही इमारत तोडून प्रांण्यासाठी जागा करावी लागणार आहे.पुर्वीचे नॉमंस् स्ट्रीक नव्हते आता स्ट्रीक केलेले आहे.30 वर्षापुर्वीचे पिंजरे आहे मास्टर प्लॅन तयार केला 30 कोटीचा खर्च लागणार आहे.दरवर्षी सुचविले आहे.प्रांणी जेवनांवर मोठा खर्च आहे.सर्व खर्चाचा आढावा घेण्यात आला भाव वाढ सुचविलेली योग्य आहे.

श्री.विकास एडके : दर वाढविण्याची गरज आहे असे वाटत नाही मी स्वत:कुटूंबा सोबत 14-2-2016 रोजी गार्डन मध्ये गेलो पार्कींग पासून सुरूवात झाली ती लिगली आहे काय गेट एन्ट्री पासून झु गेट एन्ट्री पर्यत वेळ वाढविण्या ऐवजी कमी झालेला आहे.जेव्हा मुख्य गेट ची इन्ट्री केली वेळ आली 3.24 मिनिटे तर झु गेटच्या तिकिटावर एन्ट्री आली 2.56 मि.म्हणजेच तेथे गैर प्रकार आहे की नाही. 30 रू पार्कींगचे घेतात काहीही सुविधा नाही. वास येतो.पार्कींग मध्ये कुठला शो दाखवितात.

श्री.अब्दुल र नाईकवाडी : तिकीट विक्री होते तेथील ऑडीट व्हावे.सुविधा दयाव्यात तर लोक पैसे देतील.

श्री.विकास एडके : गैरव्यवहारा होते माहिती घ्यावी तोपर्यत या दरवाढीला स्थगिती दयावी. तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावावे वर्ग चारचे कर्मचारी वसुली करतात हे योग्य वाटत नाही.

सहा.संचालक (प्रां.सं). : तिकीट विक्री संदर्भात चौकशी केली जाईल.

श्री.विकास एडके : या प्रकरणात जोपर्यत अभ्यास होत नाही तोपर्यत यास स्थगिती दयावी दरवाढ करू नये.

मा.सभापती :या संबधी चौकशी करावी.

श्री.विकास एडके : काऊंटरवर सीसीटीव्ही कॅमेरे बसावावे तसेच वर्ग 4 चे कर्मचारी वसुलीसाठी बसवितात हे योग्य नाही. हे सर्व गैर प्रकार थांबले तर दर वाढण्याची गरज नाही

मा.अति.आयुक्त : मास्टर प्लॅन नुसार प्राण्यांचे पालन करावे असे शासनाने निर्देश आहे रूल आहे दररोजच प्रत्येक नागरीक प्रांणी संग्रलायात भेट देण्यास जात नाही. तेथे जमा होणारा निधी हा त्याच ठिकाणी खर्च करण्यात येईल त्याचे वेगळे खाते ठेवणेत येईल. तेथील जाळी व इतर कामे करणे आवश्यक आहे. चांगली व्यवस्था ठेवल्यास प्रांण्याचे वयोमान वाढते.

श्री.अब्दुल नाईकवाडी :प्रांणी संग्रहालय प्रवेश शुल्क 50-25 करावे शालेय विदयार्थ्यांना सवलतीच्या दराने तिकीट असावे.

श्रीमती समीना शेख : शैक्षणिक सहल असेल शालेय विदयार्थी असेल यांना सवलत असावी.

श्री नितीन चित्ते : तेथील वसुली तेथेच खर्च होईल असे म्हटले चांगला निर्णय घेतला आहे.सुवर्ण मध्य साधून दर वाढ करावी.

मा.सभापती : विदयार्थी व शालेय मुलाच्या बाबत काय धोरण आहे. वर्ग 4 चे कर्मचारी कॅश काऊटंरवर बसवू नये.

सहा.संचालक (प्रा.सं) :अपंग एडस् बाधीत असेल 50 टक्के सवलत होती.विदयार्थी लहान मुले असेल तर 12 वर्षा खालील यांना 50 टक्के व त्यापुढील वयाचे असतील तर पुर्ण प्रवेश शुल्क आकारत होतो.

श्री.अब्दुल नाईकवाडी : विदयार्थ्या सहल असेल तर 25 टक्के सवलत दयावी.

श्री.नितीन चित्ते : यात भाग पाडू नये एकच दर ठेवावे.

मा.सभापती : महापालिकेची आर्थीक बाजू बघता सभागृहातील झालेली चर्चा यानुसार सिध्दार्थ उदयान प्रौढासाठी 20 व मुलांसाठी 10 प्राणी संग्रहालय 50 व मुलांसाठी 20 मत्सालय 10 व मुलासाठी 5 व मिनीट्रेन 20 रू या प्रमाणे आकारणी करणे.प्रत्येक वर्षी 20 टक्के दर वाढ करण्यात यावी.तेथील फेरीवाले यांचेवर ही नियंत्रण असावे.

श्री.विकास एडके :उदयान मध्ये पार्कीग मध्ये पाकीटमार मोबाईल चोरी प्रकरण होते.सीसीटीसी कॅमेरे बसवावे.

मा.सभापती : पार्कीग स्वच्छता व तेथे सीसीटीव्ही तसेच फेरीवाले यांचेवर नियत्रंण ठेवणे,ज्या सुचना केल्या त्यानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान, प्राणि संग्रहालय, मत्स्यालय व मिनीट्रेन प्रवेश फी मध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | प्रवेश फी | प्रशासनाने प्रस्तावित केलेले प्रवेश फी वाढीव दर रूपये | | स्थायी समितीने मंजूर केलेले प्रवेश फी वाढीव दर रूपये | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रौढांसाठी | मुलांसाठी | प्रौढांसाठी | मुलांसाठी |
| 01. | सिध्दार्थ उद्यान | रू.30.00 | रू.15.00 | रू.20.00 | रू.10.00 |
| 02. | प्राणी संग्रहालय | रू.100.00 | रू.50.00 | रू.50.00 | रू.20.00 |
| 03. | मत्स्यालय | रू.15.00 | रू.10.00 | रू.10.00 | रू.5.00 |
| 04. | मिनीट्रेन | --- | रू.20.00 | --- | रू.20.00 |

तसेच यापूढे प्रत्येक वर्षी सिध्दार्थ उद्यान, प्राणि संग्रहालय, मत्स्यालय व मिनीट्रेन प्रवेश फी मध्ये 20% वाढ करण्यासही मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 51 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. **निवासी** :- राहते घर, माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

०२. **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. **व्यावसायीक** :- **०१.** पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने व शासकीय कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

०४. **शैक्षणिक संस्था** :- **अ)** ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

**ब)** ज्या शैक्षणिक संस्था विनाअनुदानित आहेत, इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

०५. **भारत सरकारच्या मिळकती** :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.९००/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

०७. **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०८. **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| **सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे** | **सध्याचे सामान्य कराचे दर** | **प्रस्तावित सामान्य कराचे दर** |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त 'अ' प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त 'ब' प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त 'क' प्रमाणे) | ४५% | ४५% |

| | | |
|---|---|---|
| ४. औद्योगीक (उपरोक्त 'ड' प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

०९. **उपभोक्ता कर** :-

घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**०१** निवासी वापराच्या मिळकतीस रू.१००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

**०२** निवासेत्तर, व्यावसायीक, शैक्षणिक, औद्योगिक वापराच्या मिळकतीस रू.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

१०. **नामांतर शुल्क** :- खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| **निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य** | **नामांतर शुल्क** | |
|---|---|---|
| | **(शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी)** | **(शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी)** |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| **औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी** | | |
| रू.०१ ते ५०,०००/- | | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | | रू.७५,०००/- |

११. **अदत्त रकमेवरील शास्ती** :-

चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

११.१ **अवैध बांधकामावर शास्ती** :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७ (अ) नुसार दि.१-४-२००८ पासून अवैध बांधकाम किंवा पूनर बांधकामास तथा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध म्हणून राहील तो पर्यंत वसूल करण्यात येईल.

१२. **विशेष सवलती** :-

**१२.१** पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सूट देण्यात येईल.

**१२.२** तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

१२.३ जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१६-२०१७ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

१२.४. आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

१२.५ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.७ जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात १% सूट देय राहील.

१३. **कर आकारणी प्रणाली** :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१६ साठी शिघ्र शिध्द गणकाचे दर अद्याप शासनातर्फे प्रसिध्द न झाल्याने सन २०१५ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा प्रचलीत दर /चौ.मी. | सन २०१६ च्या विभागानुसार प्रस्तावित मिळकतीचा दर /चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते १०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

सिध्द शिघ्र गणक सन २०१५ नुसार शहरातील चार विभागांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता त्यामध्ये सरासरी १७४.६९ टक्के टक्के वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सन २०१५-१६ च्या विद्यमान दरात सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कर आकारणीच्या दरात सरासरी २५ टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१४. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी.प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-**

**१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**१४.२ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.३.७५/- | रू.२.५/- | रू.१.२५/- |

**१४.३ (अ) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**१४.४ (अ) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू.२.५/- |

**१४.५ (ब) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**१४.६ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

**१४.७ (क) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**१४.८ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

**१४.०९ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.१० सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३५/- | रू.३२.५/- | रू.३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू.२७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

**१४.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१५-१६ साठी प्रचलीत दर | सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२.९ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११.३० |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | २४.०० | ३० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ९.६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | **शेड** | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४.८३ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.५ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | **सहान जागा** | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९.०३ | ११.२९ |

**१४.१२ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कीग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.१३ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

**१४.१४ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**१४.१५ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

**टिप** :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१५-२०१६ साठी प्रचलीत दर व सन २०१६-१७ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१५-१६ साठी प्रचलीत दर | सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| १० | उपभोक्ता कर | निवासी वापरासाठी | १०० प्रती वर्ष | १०० प्रती वर्ष |
| | | निवासेतर / व्यावसायीक वापरासाठी | ५०० प्रती वर्ष---- | ५०० प्रती वर्ष---- |

१६ **शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करिता, सन २०१६-१७ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : जो प्रस्ताव समोर आला त्यावर येथे चर्चा करण्या ऐवजी सविस्तर सर्वसाधारण सभेत चर्चा करूनच कराचे दर निश्चित करण्यात यावे हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यास शिफारस करण्यात येते.

श्री.नितीन चित्ते : सध्याची कर प्रणाली कशी आहे माहिती दयावी.

उपआयुक्त (मालमत्ता) : जागेच्या सिध्द शिघ्र गणकानुसार वार्षीक भाडे निश्चित करतो.एक महिण्याचे भाडे गुणे 12 याप्रमाणे जे भाडे येईल त्यातून मेन्टनंससाठी 10 टक्के मायनस करून उर्वरीत रक्कमेवर जसे कराचे दर आहे त्याप्रमाणे कर लावतो.

श्री.नितीन चित्ते : हे दर सिध्द सिघ्र गणकानुसार म्हणजे शासनाकडून दर येतात.यात अबकड असे भाग केले सिडको हडको भागासाठी सन 2006 ते 2012 पर्यंत ड वर्ग प्रमाणे कर लावला त्यानंतर अ प्रमाणे लावतो हे सत्य का ? एरीया मध्ये बदल झालेला नाही तरी दर वाढले कसे. बंजरग चौक ते जळगाव रोड आंबेडकर नगरकडे जाणा-या रस्त्यावर रेडीरेकनर रहिवासी कर 31000 हा ड वर्गवारीचा कर आहे 45000 अ वर्गवारीचा दर लावतो आहे.सरस्वती भुवन एमपीला कॉलेज जवळील निवासी रेट 45000 हजार म्हणजेच सिडको हडको व समर्थनगर भागासाठी एकच रेट ही पध्दत बदं करावी सिडको हडको वर अन्याय होतो आहे. हे गभीरंतेने घेतले पाहिजे काही सवलती देतो. एप्रिल पैसे भरणा केल्यास 10 टक्के मे 10 टक्के जून 6 टक्के अशी सवलती देतो.काहीनी पैसे भरणा केले तर पुन्हा त्यांचे खात्यावर पैसे प्रलंबीत दाखवितात तसे सॉप्टवेअर नाही असे वाटते.मोबाईल टावर्स वर चार सर्वीसेस देत असेल तर चार सर्वीस टॅक्स घेतला पाहिजे. सिव्हरेज कर लावणे बाबत पॉलीसी ठरली होती.2010 पासून हा कर सुरू केला किती दिवस लावणार आहे.कर माफ करणे बाबत प्रस्ताव झ ाला ते तपासावे.सायकल स्टॅन्ड दर आकारतांना क्राईट एरिया ठरवून दिला पाहिजे.क्लासेस चालतात, हॉस्पीटल आहे प्रस्ताव ठेवतांना सामान्य नागरीकांचा विचार केला पाहिजे. सिडको हडकोची प्रॅापर्टी जो पर्यत सिडको एनओसी देत नाही तोपर्यत परवानगी मिळत नाही.काही लोकांनी मोठया रस्त्यावर ॲक्टीव्हिटीज सुरू केल्या तेथे दुकान असेल तर कमर्शीयल टॅक्स बाकी निवासी टॅक्स लागला जातो.हे नियमात बसते का झोनींग क्षेत्रवाईज कर ठरवावे. ओपन स्पेस बाबत धोरण ठरवावे त्याचे टॅक्स वाढवावे.

श्री.गजानन बारवाल : गुंठेवारीतील भागासाठी कमर्शिलय टॅक्स करू नये.ओपनस्पेसच्या जागेला टॅक्स लावतांना योग्य धोरण ठरवावे.लॉन्स बाबत योग्य निर्णय घ्यावा प्ले ग्राऊड शाळेचे ग्राऊड यांना कमी का लावावा.स्वा.सैनिक माजी सैनिक यांना सवलत दिली पाहिजे.

मा.सभापती : सन 2016-2017 या वित्तीय वर्षात मनपा क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा बाबतचा प्रस्ताव आहे, प्रस्तावावर सर्व समंतीने निर्णय होणे आवश्यक आहे, सर्वसाधारण सभेमध्ये यावर सर्व स.सदस्य चर्चा करतील. त्याकरीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याची शिफारस करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2016-2017 या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या 20 तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेला आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, मालमत्ता करांचे दराबाबतच्या प्रस्तावावर सर्व समंतीने निर्णय होणे आवश्यक असल्यामुळे, सर्वसाधारण सभेमध्ये यावर सर्व स.सदस्य चर्चा करून निर्णय घेतील. करीता सदर ठराव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 52 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या समन्वयाने शहराच्या विविध चौकात (1) रोपळेकर हॉस्पीटल चौक (2) एन-5 चौक पाण्याची टाकी (3) क्रांतीचौक (4) एस.बी.ओ. चौक (5) हर्सुल टी पॉईट (6) कोकणवाडी (पदमपुरा) (7) उस्मानपुरा चौक (8) लिटील फ्लॉवर चौक शांतीपुरा (9) आंबेडकर चौक (10) एकता चौक (शहानुरमियॉ दर्गा) (11) सेव्हनहिल चौक (12) अभिनय चौक इत्यादी चौकात नविन वाहतुक संकेतांक बसवण्यासाठी रक्कम रूपये 106.62 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदर कामाचा खर्च जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) सन 2014-15 या लेखाशिर्षातुन भागविण्यात येणार असून, अंदाजपत्रकाच्या 50% रक्कम रूपये 53.31 लक्ष जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) मधुन प्राप्त होणार असून, उर्वरीत 50% तरतुद महानगरपालिकेच्या फंडातुन करावी लागणार आहे. या अंदाजपत्रकास दिनांक 20/08/2015 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.64 अन्वये ठरावास मान्यता दिलेली आहे.

उक्त मान्यतेनंतर सदर कामासाठी B-1 नमुन्यात ई-निविदा मार्फत निविदा मागविण्यात आल्या असून, चार निविदा प्राप्त झाल्या आहे. पैकी M/s Nucleonics Traffic Solutions PVT.LTD, Pune यांनी निविदेसोबत 1% अनामत रक्कम दाखल न केल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही. उर्वरीत तीन निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | जे.पी.ट्राफीक ऑटोमेशन प्रा.लि. पुणे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.95% कमी |
| 02. | मे.सी.एम.एस.ट्राफीक सिस्टीम, पुणे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25% कमी |
| 03. | मे.न्युक्लीऑनिक्स ट्राफीक इक्वीपमेंट प्रा.लि.पुणे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.2% कमी |

उपरोक्त प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या जे.पी.ट्रॉफीक ऑटोमेशन प्रा.लि. पुणे यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.95% कमी दराची प्राप्त आहे. तरी मे.जे.पी.ट्राफीक ऑटोमेशन प्रा.लि. पुणे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.95% कमी दराची निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

उपअभियंता श्री.बनसोडेः शहरात जुने सिग्नल 33 आहे 13 सिग्नचे काम चालू आहे.7 सिग्नल चालू केले बाकीचे सिग्नलचे काम 15 दिवसात पुर्ण होतील.प्रस्तावति केल्यानुसार यावर 24 लक्ष खर्च येतील.

शहर अभियंता :दुरूस्तीचे काम सुरू केले 80-90 टक्के काम झाले. डिपार्टमेंन्टली हे काम करणार आहे डीपीडीसीकडून पैसे आलेले आहे.नवीन सिग्नल करणार आहे. देखभाल दुरूस्तीवर महापालिका खर्च करणार आहे.जे बंद आहे ते चालू करण्या बाबत कार्यवाही होईल.

मा.सभापती :विषय मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील विविध चौकात (1) रोपळेकर हॉस्पीटल चौक (2) एन-5 चौक पाण्याची टाकी (3) क्रांतीचौक (4) एस.बी.ओ. चौक (5) हर्सुल टी पॉईट (6) कोकणवाडी (पदमपुरा) (7) उस्मानपुरा चौक (8) लिटील फ्लॉवर चौक शांतीपुरा (9) आंबेडकर चौक (10) एकता चौक (शहानुरमियॉ दर्गा) (11) सेव्हनहिल चौक (12) अभिनय चौक इत्यादी चौकात नविन वाहतुक संकेतांक बसवण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.95% कमी दराची जे.पी.ट्रॉफीक ऑटोमेशन प्रा.लि. पुणे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 53 :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील अस्तीत्वात असलेले संपुर्ण पथदिवे काढुन त्या ठिकाणी उर्जा बचत / LED / तत्सम प्रकारचे पथदिवे BOT तत्वावर लावणे तसेच मुलभुत सुविधांची (Infrastructural works) कामे करणे, या बाबतच्या प्रस्तावास BOT पध्दतीने काम करण्यासाठी निविदा तयार करणे, निविदेच्या अटी / शर्ती ठरविणे करीता आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मा.सर्वसाधारण सभा दि. 20.05.2014 ठराव क्र. 457 अन्वये सिकृतीसह मंजुरी देण्यात आलेली आहे.

वरील मंजुरीप्रमाणे कार्यालयीन पत्र जा.क्र. 256/दि 30.07.2014 प्रमाणे निविदा प्रसिध्दीस देण्यात आली. सदर निविदेच्या संदर्भाने प्राप्त होणा-या निविदांचे तांत्रिक कागदपत्रे तपासणी करणे, आर्थिक व्यावसायिक बाबी तपासणी, प्राप्त निविदा दर इ. बाबी तपासुन, अभ्यास करुन निविदा अंतिम करण्यासाठी मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखाधिकारी, विधी सल्लागार व विभाग प्रमुख (विद्युत) यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने प्राप्त झालेल्या निविदांपैकी 01.पॉलीकॅब वायर्स प्रा. लि. 02. शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कं. लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा. लि. (Joint Venture) 03. इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा. लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (Joint Venture) अशा एकुण तीन निविदांची तपासणी केली असता मे.पॉलीकॅब वायर्स प्रा. लि. आणि शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कं. लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा. लि. (Joint Venture) यांच्या निविदा कंत्राटदार निविदेतील तांत्रिक पात्रतेचे निकष पुर्ण करीत नसल्याने बाद ठरविण्यात आल्या. आणि इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा. लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (Joint Venture) यांची निविदा उघडण्याचा निर्णय झाला.

प्राप्त निविदेप्रमाणे

| | |
|---|---|
| Part-A | : Rs.86,93,17,400/- |
| Part-B | : Rs.25,28,50,680/- |
| Part-C | : Rs. 44,57,92,896/- (Cost to AMC for Electricity Bill for 10 years) |
| Part-D | : Rs. 9,12,00,000/- (दोन वर्षाची देखभाल दुरुस्ती रक्कम) |

आणि पात्र कंपनी / ठेकेदार यांनी रु. 2,72,00,000/- EMI ची मागणी केली व या EMI मध्ये ठेकेदाराने Part-A आणि Part-B ची 112,21,68,080/- रुपयांची कामे करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या संदर्भाने सविस्तर चर्चा करुन समितीने इतिवृत्त जा.क्र. 335/दि.02.09.2014 प्रमाणे मान्यता दिली आहे.

या सर्व बाबींसह प्राप्त झालेली निविदा मा.स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी सादर केली असता स्थायी समितीने प्रस्तावास विषय क्र.69 दि.03.09.2014 नुसार मान्यता प्रदान केली आहे. यानंतर रितसर कार्यवाही करुन कंत्राटदारासह करारनामा करुन त्यास कार्यादेश जा.क्र.340 दि.03.09.2014 अन्वये काम सुरु करण्याचा आदेश देण्यात आला.

या आदेशास आणि निविदा मंजुरी प्रक्रियेस मे.पॉलीकॅब वायर्स प्रा. लि. आणि शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कं.लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा. लि. (Joint Venture) यांनी मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे रिट याचीका दाखल करुन आव्हान दिले. त्यानुसार

1. W.P. 7843/14 शाह इन्व्हेस्टमेंट विरुध्द मनपा
2. W.P. 8211/14 पॉलीकॅब प्रा. लि. विरुध्द मनपा

सदरील प्रकरणात निविदाधारक कं. मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम सोबत मनपा प्रतिवादी होती.

या दोन्ही याचीकांची एकत्रित सुनावणी होऊन दि. 14.10.2014 रोजी मा.उच्च न्यायालयाने निकाल दिला. त्या आदेशाप्रमाणे महानगरपालिकेने निविदा मंजुरी घाई घाईत केल्याने मनपाच्या निर्णयात हस्तक्षेपाची आवश्यकता असल्याने कारणमिमांसेसह नमुद करुन मा.स्थायी समितीने घेतलेला निर्णय आणि दि.03/09/2014 चा करारनामा व कार्यादेश रद्द करण्याचे आदेश पारीत केले.

दि.14.10.2014 रोजीच्या मा.उच्च न्यायालयाने दिलेला आदेश इलेक्ट्रॉन लाईटिंग सिस्टीमच्या विरोधात असल्यामुळे त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सदरील SLP No.34129-34130/2014 मध्ये सुनावणी घेऊन दि. 20/11/2015 रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. त्यात इलेक्ट्रॉन लाईटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे अपील मा.सर्वोच्च न्यायालयाने अंशतः मंजुर केले.

या निर्णयाप्रमाणे दि.03.09.2014 रोजी केलेला करारनामा आणि कार्यादेश या अन्वये महानगरपालिकेने प्रदान केलेला पोलवर जाहिरात लावण्याचा अधिकार रद्दबातल केला असुन त्यासाठी पोलवरील जाहिरात ही निविदे व्यतिरिक्त बाब असल्यामुळे ती अट करारनाम्यातुन व कार्यादेशातुन वगळण्यात येत आहे असे निकालात मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नमुद केलेले आहे. सदरील निर्णयामुळे महानगरपालिका पोलवरील जाहिरातीसाठी (Kiosk) नव्याने निवीदा करण्यास मुक्त आहे. यावरुन असे निदर्शनास येते की दि. 03.09.2014 रोजी केलेला करारनामा आणि कार्यादेश हे जाहिरातीचे अधिकार वगळल्यामुळे नव्याने करणे योग्य राहील, ही कार्यवाही न्यायालयीन निर्णयानुसार अभिप्रेत आहे.

प्रकरणात नव्याने करारनामा, कार्यादेश देण्यापुर्वी प्रशासकीय निर्णयांचा संस्थेच्या आणि जनतेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने पुर्नअवलोकन करणे आवश्यक असल्याने संपुर्ण निविदे प्रक्रियेची आणि आर्थिक बाबींची तसेच न्यायालयीन निर्णयांच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, कार्य. अभियंता, विधी सल्लागार यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने निविदेच्या सर्व भागाची तपासणी करुन खालील प्रमाणे अहवाल दिला आहे. या अहवालानुसार सध्याच्या बाजारभावानुसार एल.ई.डी. स्ट्रीट लाईटची किंमत काढली आहे.(सोबत तक्ता जोडला आहे.)

(1) सोबत जोडलेल्या सदर तक्त्यानुसार जर मनपाने नविन निविदा प्रसिध्द केली किंवा आपल्या स्तरावर उत्पादकाकडुन एल.ई.डी. स्ट्रीट लाईट खरेदी केल्यास निविदा दर व वर नमुद आजचे दर यामध्ये मनपाची अंदाजे 60% ते 70% पर्यंत बचत होऊ शकते.

(2) निविदा भाग-ब इन्फ्रास्ट्रक्चरची कामे करणे ही बाब CSR रेटवर आधारीत आहे ती नविन निविदा मागविल्यास मनपाची 20% बचत होऊ शकते जी अंदाजे रु. 5.00 कोटी पर्यंत येते.

(3) निविदा भाग - क व ड हे केवळ निविदेत अंतर्भुत केलेले असुन त्याची आवश्यकता वाटत नाही, कारण LED खरेदीचा उद्देशच उर्जा बचतीचा आहे.

सद्य परिस्थितीत मे. इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांना नव्याने करारनामा आणि कार्यादेश करुन देण्यात आलेला नाही. त्यांनी काम सुरु केलेले नाही. त्यामुळे त्यांची कोणतीही आर्थिक गुंतवणुक

झालेली नाही. मनपाचे आर्थिक नुकसान होत असल्यास करारनामा करता येणार नाही. हा निर्णय व्यापक जनहितार्थ घेणे योग्य राहील. या निर्णयाने मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही, तथापि संबंधित पात्र निविदा धारक अरबीट्रेशन (Arbitration) लवादाकडे नुकसान भरपाईचा दावा दाखल करु शकतात, दावा दाखल झाल्यास तो चालविण्यासाठी मनपास लागणारा खर्च वरील नमुद नुकसानीपेक्षा तुलनेने खुपच कमी असेल त्याचप्रमाणे लवादासमोर मनपाची बाजु प्रभावीपणे मांडुन तो दावा निकाली काढता येईल कारण संबंधितांने अद्याप काम सुरु केलेले नाही आणि त्यांची कोणतीही आर्थिक गुंतवणुक झालेली नाही.

या पुढे आवश्यकता भासल्यास आणि मनपाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन मनपा स्तरावर LED खरेदी करुन उपलब्ध यंत्रणेमार्फत तसेच आवश्यकता भासल्यास कंत्राटदारामार्फत खरेदी / दुरुस्तीची कामे करण्यात येतील.

सदरचा प्रस्ताव मंजुर झाल्यास वरील नमुद परिस्थितीमुळे करारनामा / कार्यादेश देणे जनतेच्या हिताचे नसल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अवमान होण्याचे संभव नाही. हे सर्वोच्च न्यायालयात निकाली निघालेल्या प्रकरणात दिवाणी अर्ज दाखल करुन निदर्शनास आणुन देता येईल आणि आदेशानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

वरील परिस्थिती विचारात घेता मे. इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. या संस्थेची निविदा शहरातील जनतेचे हित व मनपाचे आर्थिक हित जपणारी नाही असे वाटते, त्यामुळे मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे सोबत केलेला करारनामा व त्यांना दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

| **Sr. No.** | **Code** | **Watts** | **Qty** | **Tender Amount** | **Amount As per Quoted Rate** | **Rate Collected From open Market (Bajaj Make)** | **Expected Expenditure as per Col.7** | **Syska LED Quted Rate** | **Expected Expenditure as per Col.9** | **Syska Led Watt** | **Saving of AMC as per open Market LED Current Rate** | **Saving of AMC as per Syska LED Current Rate** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12 (6-8)** | **13 (6-10)** |
| | | | | | | | | | | | | |
| 1 | B 1 | 21 | 11800 | 15751 | 185861800 | 4775 | 56345000 | 3218 | 37972400 | 25 | 129516800 | 147889400 |
| 2 | B 2 | 31 | 8200 | 16513 | 135406600 | 8437 | 69183400 | 3903 | 32004600 | 40 | 66223200 | 103402000 |
| 3 | B | 50 | 7800 | 23935 | 186693000 | 9000 | 70200000 | 4523 | 35279400 | 50 | 116493000 | 151413600 |
| 4 | B 1 | 50 | 3200 | 23935 | 76592000 | 11812 | 37798400 | 8675 | 27760000 | 40 | 38793600 | 48832000 |
| 5 | B 1 | 75 | 8000 | 31358 | 250864000 | 12150 | 97200000 | 9914 | 79312000 | 60 | 153664000 | 171552000 |
| 6 | A 2 | 100 | 1000 | 33900 | 33900000 | 18000 | 18000000 | 14870 | 14870000 | 90 | 15900000 | 19030000 |
| | | | | **Total** | **869317400** | | **348726800** | | **227198400** | | **520590600** | **642119000** |

मा.सभापती : या विषयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही, याची दक्षता घेऊन तसेच बाजार भावातील एल.ई.डी. बल्ब कमी झालेल्या किमती लक्षात घेता, मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. या संस्थेची निविदा शहरातील जनतेचे हित व मनपाचे आर्थिक हित जपणारी वाटत नसल्यामुळे, मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे सोबत यापूर्वी केलेला करारनामा व त्यांना दिलेले कार्यादेश रद्द करण्याची कार्यवाही करण्याचे आदेशही देण्यांत येत आहे.

नगरसचिव :(विषय वाचन करतात.)

मा.सभापती :विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : या प्रकरणी कोर्ट प्रकरण झाले.या बाबत समिती गठीत करण्यात आली होती.महापालिकेचे यात आर्थीक नुकसान होत आहे असे म्हटले.मा.उच्च न्यायालयाचे आदेश व मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता

घेऊन करारनामा रद्य करण्यात येऊन कार्यवाही करण्यात येत आहे.मा.सर्वोच्च न्यायालयात या सर्व बाबी मांडल्या जातील.

मा.सभापती : यात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन बाजारभावानुसार किंमती विचारात घेता मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि.या संस्थेची निविदा शहरातील जनतेचे हित व मनपाचे आर्थीक हित जपणारी नाही त्यामूळे मे इलेक्ट्रॉन लायटींग सिस्टीम प्रा.लि.यांचे सोबत केलेला करारनामा व त्यांना दिलेले कार्यादेश रद्य करण्याची कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :कार्यरत असलेले मा.आयुक्त श्री.केंद्रेकर साहेब यांना येथे कायम स्वरूपी महापालिकेत ठेवण्याचा ठराव मंजूर करावा.

मा.सभापती :आयुक्त श्री.केंद्रेकर यांनी पुर्ण कार्यकाळ येथे काम करण्याचा ठरावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही, याची दक्षता घेऊन तसेच बाजार भावातील एल.ई.डी. बल्बच्या कमी झालेल्या किमती लक्षात घेता, मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. या संस्थेची निविदा शहरातील जनतेचे हित व मनपाचे आर्थिक हित जपणारी वाटत नसल्यामुळे, मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे सोबत यापूर्वी केलेला करारनामा व त्यांना दिलेले कार्यादेश रद्द करण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर आजची सभा राष्ट्रगिताने संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद